**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग.**

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबतच्या ई-निविदेतील कमी दराला प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मि. इतके आहे. मनपा कार्यक्षेत्रामध्ये २०२७ बोअरवेल आहेत. बोअरवेल निगा व दुरुस्तीचे कामकाज वार्षिक ठेकापध्दतीने ठेकेदारा मार्फत करुन घेतले जाते.

मनपाच्या कार्यक्षेत्रात दररोज बोअरवेल नादुरुस्तीच्या तक्रारी येत असतात सदर तक्रारींचे निवारण वेळेच्या वेळी करावे लागते तसेच पदाधिकारी तसेच नागरीकांच्या प्रत्यक्ष व फोन वरुन दैनंदिन प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करावे लागते. सद्या मनपाच्या भंडारगृहात (उदा. हातपंप साठी लागणारे साहित्य जीआय युनिअन, जीआय पाईप, हॅन्ड पंप सिलेंडर, हॅन्ड पंप जीआय स्टॅन्ड, वॉटर टँक, जीआय हेड, गन मेटल अप्पर व्हॉल्व, गन मेटल लोवर व्हॉल्व, स्टेनलेस स्टील प्लंगर रॉड, रेड्युसर कॅप, गन मेटल प्लंगर लॉक बॉडी, व्हॉल्व रबर सिटींग, सिटींग रिंग, पंप बकेट, गन मेटल फ्लॉवर, गन मेटल चेक व्हॉल्व गाईड, गन मेटल चेक व्हॉल्व सेट, सिलेंडर बॉडी लाईनर, गॅलोनीस हॅन्डल बार, स्टेनलेस स्टील हॅन्डल बार, एसकेएफ बेअरिंग ६२०४ झेड, रोलर चैन, बॉडी नटबोल्ट, जीआय वॉशर एम-१२.४ एम.एम., रॉड कपलिंग, कनेक्टींग रॉड, कनेक्टींग रॉड १२ एम.एम., हेड फॉर इंडिया मार्क, बोअरिंग ग्रिस व सबमर्सिबल पंप साठी लागणारे साहित्य ३ कोर ४.० स्के.एम.एम. कॉपर केबल, पॅनेल बोर्ड १ ते ६ एचपी, पीव्हीसी आरमाऊर्ड केबल २ कोर ४ स्के. एम.एम. ॲल्युमेनिअम कंडेनकटर, सबमर्सिबल पंप सेट २३० व्हो ५० एचझेड एसी सप्लाय, मोटर २ एचपी थ्री फेज १४०० एरपीएम ऑल टाईप्स, एमडीपीई पाईप आयएसओ ४४२७:१९९६, जीआय कप्लींग निप्पल फ्री क्लास इत्यादी किरकोळ साहित्य) उपलब्ध नसल्यामुळे आवश्यकते नुसार नविन साहित्य मागविणे आवश्यक आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वातअसलेल्या बोअरवेल दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबतच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. २६,९७,६४७/- मात्रची ई निविदा सुचना क्र. ३२ दि. ३०/०९/२०२४ ते ०७/१०/२०२४ या कालावधीत मनपाच्या महाटेंडर व ठाणे वैभव या वृत्तपत्रात पसिध्द करण्यांत आली होती. दिनांक १०/१०/२०२४ रोजी ई-निविदा निविदा समिती समोर उघडली असता एकूण २ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे राम दशरथ कोरे यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.५५० टक्के कमी दराची रक्कम रु. २५,४७,९२८/- मात्रची प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वातअसलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबत.** | **रु. २५,४७,९२८/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

**प्रशासकीय ठराव क्र.** ६५४ **दिनांक :-** ११ /१० /२०२४

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वातअसलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी साहित्य पुरविणे बाबतच्या कामाचे निविदाकार मे राम दशरथ कोरे यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.५५० टक्के कमी दराने म्हणजेच रु. २५,४७,९२८/- मात्र प्रमाणे असून या दरांना मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका,भिवंडी.**

o/c